# प्रात्यक्षिक क्र. २
# प्लॅकेट आणि कपड्यातील बंध

*प्लॅकेट म्हणजे कपड्यातील उघड्या ठेवलेल्या बाजू ज्यामुळे कपडा अंगात घालणे व काढणे सोपे होते.*

### साधे प्लॅकेट:


पूर्णपणे उघड्या असलेल्या कपड्यासाठी म्हणजेच शर्ट, साडी ब्लाउज याकरीता साधे प्लॅकेट वापरतात. यासाठी दोन वेगवेगळ्या पट्ट्या कापतात. उजव्या बाजूची पट्टी अर्धी दुमडली जाते. ज्यामुळे कपड्याची एक बाजू वाढविली जाते. कापडाच्या डाव्या बाजूची जोडलेली पट्टी दुमडली जाते दुमडलेली ही पट्टी उजव्या बाजूच्या वाढविलेल्या पट्टीवर अशाप्रकारे ठेवली जाते की उजव्या बाजूची पट्टी डाव्या बाजूच्या पट्टीच्या खाली येईल.

**आवश्यक साहित्य :** सौम्य रंगाचे पॉपलीन कापड, कापडाच्या रंगाचे धागे, मापे घेण्याचा टेप, कात्री, टेलर्स चॉक.

**कृती :** कापड टेबलवरती पसरवावे आणि त्यावरती दोन पट्ट्या आखून घेवून उभ्या दिशेने कापून घ्या. प्रत्येक पट्ट्यांची मापे.

लांबी – १५ से.मी.

रूंदी – ८ से.मी.



चित्र क्र. २.१ : साधे प्लॅकेट

शर्टच्या दोन्ही बाजूला उजवी आणि डावी बाजू अशा खूण करून घ्या आणि लांबीत कापून घ्या. १५ से.मी. लांबी आणि ५ से.मी. रूंदीची उजवी पट्टी शर्टच्या उजव्या बाजूला जोडा. पट्टी जोडतांना शर्टची सरळ बाजू व पट्टीची सरळ बाजू एकमेकांवर ठेवून जोडा. त्यानंतर पट्टीची अर्धी बाजू दुमडा. ज्यामुळे शर्टची उजवी बाजू मोठी होईल. त्याचप्रमाणे शर्टच्या डाव्या बाजूला १५ से.मी. लांब व ३ से.मी. रूंदीची डावी पट्टी जोडा.

**कपड्यांतील बंध :** कापडातील बंध फार महत्वाचे असतात. कारण कपडे घातल्यानंतर प्लॅकेट बंद करावे लागते व कपडे काढण्यासाठी प्लॅकेट उघडावे लागते.

हे बंध विविध प्रकारचे असतात.

१) **बटण :** ही सर्वात जास्त प्रमाणात वापरतात. बटनांमध्ये दोन किंवा चार छिद्रे असतात बटणे अशा पद्धतीने शिवतात. कपड्याचा वरचा काठ व खालचा काठ समांतर यायला हवा. बटणांच्या छिद्रामधुन सुई अशाप्रकारे टाकली जाते की, + चिन्ह तयार होईल. बटणांमधील दोन छिद्रांमधुन बहुधा असा टाकला जातो की, = असे चिन्ह तयार होईल.

बटणांची काजे ही हाताने किंवा यंत्राद्वारे केली जातात. काजांचा आकार हा बटनानूसार योग्य असायला हवा.



चित्र क्र. २.२ : बटण

२) **हूक–लूप:** हूक धातूचे असतात. ज्यावेळी बंध अदृश्य असणे आवश्यक असते, त्यावेळी हूक शिवतात. उदा. गळ्याचे टोक, कमरेचा पट्टा इ. प्लॅकेटच्या एकमेकांवर येणाऱ्या बाजूंपैकी वरच्या भागावर आतील बाजूने हूक शिवतात. हूकच्या रिंगभोवती बटनहोल टाके अशाप्रकारे घालतात की ते सुलटबाजूवर दिसणार नाहीत. नंतर हूकचा लांबट भाग २ ते ३ आडवे टाके घालून शिवतात.

लूप गोलाकार किंवा सरळ दांडीप्रमाणे असते. प्लॅकेटच्या खालच्या भागावर हुकच्या विरूद्ध बाजूला लूपचा गोलाकार भाग येईल. अशा प्रकारे शिवतात. धातू ऐवजी दोऱ्याचे लूपही शिवता येतात. यासाठी प्रथम काही एकावर एक येतील असे सरळ टाके घालतात. नंतर फक्त या टाक्यांभोवती एकमेकांच्या शेजारी बटनहोलचे घट्ट टाके घालतात.



चित्र क्र. २.३ : हूक लूप

## कपड्यातील बंध







